औद्योगिक सुरक्षा व
आरोग्य संचालनालय

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
## औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय

कामगार भवन, ५ वा मजला, ब्लॉक – ई, सी–२०, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.

दुरध्वनी क्र.२६५७२५०४/०९/२२/५८. Email- dirdish.mum-mh@gov.in Website-www.mahadish.in

---

क्र. संऔसुवआ/अपघात/ e०९५ /७,

दिनांक :- 25 SEP 2024

## जाहीर निवेदन

विषय : **महाराष्ट्र कारखाने (सुरक्षा लेखा परीक्षण) (सुधारणा) नियम, २०२४ बाबत.**

शासन अधिसूचना क्र. एफएसी-२०२३/प्र.क्र.५२ (भाग-२)/कामगार-४, दिनांक १९ जून, २०२४ अन्वये महाराष्ट्र कारखाने (सुरक्षा लेखा परीक्षण) (सुधारणा) नियम, २०१४ मध्ये सुधारणा करण्यात आलेल्या असून, सुधारीत नियम प्रसिद्ध झालेले आहेत.

सदर नियमातील नियम ६(१) नुसार सुरक्षा लेखा परीक्षक म्हणून मान्यता मिळणेकरीता इच्छुक अर्जदारांनी **दिनांक ३० सप्टेंबर, २०२४ पूर्वी** नमुना-अ मध्ये (व्यक्तीकरीता) व नमुना-ब मध्ये (संस्थेकरीता) रुपये एक हजार मात्र इतक्या परीक्षा शुल्कासह संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, कामगार भवन, ५ वा मजला, ब्लॉक-ई, सी-२०, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ यांचेकडे द्विप्रतीत अर्ज करावा. सदर अर्जाकरीता विहित केलेले परीक्षा शुल्क संचालनालयाच्या “०२३० - कामगार व सेवायोजन, १०४ कारखाने अधिनियमांतर्गत जमा होणारे शुल्क (००)(०३) प्रमाणक शल्यचिकित्सकांची नोंदणी व नूतनीकरण शुल्क (०२३००२४१) या लेखाशीर्षाखाली ग्रास प्रणालीमार्फत संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, मुंबई यांचे नावे भरुन त्याच्या चलनाची प्रत अर्जास जोडण्यात यावी.

**दिनांक ३० सप्टेंबर, २०२४ पर्यंत संचालनालयास प्राप्त झालेल्या अर्जांची त्वरित छाननी करण्यात येईल व पात्र उमेदवारांची परीक्षा ऑक्टोबर २०२४ च्या पहिल्या आठवडयात घेण्यात येईल. दिनांक ३० सप्टेंबर, २०२४ नंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा जानेवारी २०२५ ते मार्च २०२५ या कालावधीत विचार करण्यात येईल.**

(दिपक पोकळे)
संचालक,
औद्योगिक सुरक्षा व आरोग्य,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.